## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, अंतर्गत बहिस्थ शिक्षण विभाग

## बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्रा साठी नियमावली

**दिनांक २७ मे २०२६**

### बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्र नियमावली

०१. आपल्या महाविद्यालयात बहिस्थ शिक्षणाचे अभ्यासकेंद्र घेत असताना महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कायम नियुक्ती प्राप्त अनुभवी व इच्छूक शिक्षकांची केंद्रसमन्वयक म्हणून नेमणूक करावी.

०२. महाविद्यालयाचे प्राचार्य हे पदसिध्द अभ्यासकेंद्र प्रमुख असतील.

०३. अभ्यासकेंद्राची शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक जबाबदारी पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील एक कनिष्ठ लिपीक व एक सेवकांची नेमणूक करावी.

०४. बहिस्थ अभ्यासकेंद्रासाठी महाविद्यालयातील एखादी स्वतंत्र खोली उपलब्ध करून द्यावी व त्यावर '' स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व्दारा संचलित बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्र'' व केंद्रप्रमुख, केंद्रसमन्वयक यांनी नावे टाकून बोर्ड तयार करून घ्यावा व तो त्या खोलीत व बाहेर दर्शनी ठिकाणी लावण्यात यावा व त्या वर संपर्क क्रमांक देण्यात यावा.

०५. अभ्यासकेंद्रावर प्रवेशासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे वृत्तपत्रातून जाहिरात द्यावी, पॉम्प्लेट वाटावेत व वातावरण निर्मिती करावी.

०६. अभ्यासकेंद्राचे संलग्नता नूतनीकरण दरवर्षी दिलेल्या कालावधीत पूर्ण करावे ज्या अभ्यासकेंद्राने नुतनीकरण पुर्ण न केलेल्या अभ्यासकेंद्राचे प्रवेश बंद करण्यात यावेत.

०७. बहिस्थ शिक्षण विभागाने तयार केलेली ''बहिस्थ शिक्षण नियमावली'' या संदर्भातील माहिती नोंटीस बोर्डावर तयार करून ती बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्राच्या कार्यालयात लावण्यात यावी जेणेकरून ती प्रवेश घेण्याऱ्या विद्यार्थ्यांनां वाचता येईल.

०८. बहिस्थ शिक्षण विभागाचे एम. ए. भाषा मराठी, हिन्दी, इंग्रजी, उर्दु, पाली,समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व लोकप्रशासन, या विषयामध्ये एम.ए. आणि एम. कॉम. अभ्यासक्रम आपल्या केंद्रावर बहिस्थ प्रणाली नुसार राबवावे.

०९. विद्यापीठाची मान्यता प्राप्त अभ्यासकेंदासाठीची प्रती विद्यार्थी शुल्क एम.ए. साठी १,५०० रूपये व एम.कॉम.साठी रूपये २४००/— शुल्क या प्रमाणे प्रवेशाच्या वेळी केंद्रावर विद्यार्थ्यांकडून जमा करून घेणे बंधनकारक आहे.

१०. प्रवेशित विद्यार्थ्यांना बहिस्थ अभ्यासकेंद्रानी अभ्यासकेंद्र समन्वयक यांच्या सहीने ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात यावे.

११. बहिस्थ प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी सुट्टीच्या दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या संपर्क सत्राचे वेळापत्रक तयार करून त्याची एक प्रत माहितीस्तव बहिस्थ शिक्षण विभाग स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, यांना देण्यात यावी.

१२. अभ्यासकेंद्रासाठी तयार करण्यात आलेली नियमावली ही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ‘बहिस्थ शिक्षण विभाग’ या पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात यावी.

## प्रवेश

०१. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या बहिस्थ शिक्षण विभागामार्फत दरवर्षी जुलै मध्ये जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर पुढील ३० सप्टेबर पर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

०२. विहित प्रवेश कालावधी नंतर प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांना बहिस्थ विभागाची पूर्व परवानगीनेच प्रवेश देण्यात यावा. विना पुर्वपरवानगी दिलेल्या प्रवेशाची सर्वस्वी जबाबदारी ही केंद्रप्रमुखाची असेल.

०३. बहिस्थ अभ्यासकेंद्राच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे सर्व प्रशासकीय, शैक्षणिक व आर्थिक व्यवहाराच्या नोंदींचे तपशिल त्या त्या अभ्यासकेंद्राने ठेवावे आहे.

०४. समंत्रकांनी बहिस्थ विद्यार्थ्यांना ग्रंथालय, अभ्यासक्रम, समंत्रणे, गटचर्चा इत्यादी बाबत माहिती द्यावी.

०५. पदव्युत्तर एम.ए. व एम.कॉम.साठी बहिस्थ प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश आवेदनपत्र पासपोर्ट फोटोसह तसेच पात्रता आवेदनपत्र, परीक्षा आवेदनपत्र सर्व आवेदन पत्रास प्रवेशाच्या वेळी शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (T.C.)ची सत्यप्रत तसेच आधारकार्डाची सत्यप्रत, बी.ए. प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष गुणपत्रकांच्या सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

०६. नियमित विद्यार्थ्याप्रमाणे बहिस्थ विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन होतील त्यांची एक हार्ड कॉपी आवेदनपत्राची छायांकित प्रत अभ्यासकेंद्रांनी आपल्या अभ्यासकेंद्रावर ठेवावी.

०७. बहिस्थ विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या शिक्षणात खंड पडलेला असल्यामुळे आणि ते नोकरी करणारे, प्रौढ असल्यामुळे त्यांच्या कागदपत्रांची केंद्रप्रमुखाने शहानिशा करूनच प्रवेश देण्यात यावेत.

०८. प्रवेशाच्या वेळी बहिस्थ पध्दतीने प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून कुठल्याही विद्यापीठाचा असला तरी स्थलांतर प्रमाणपत्र घेवू नये तसेच त्या विद्यार्थ्याने भविष्यात स्थलांतर प्रमाणपत्राची मागणी केली तर ते देता येणार नाही यांची नोंद घ्यावी.

०९. बहिस्थ शिक्षण पध्दतीने प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थ्यांने प्रवेशासाठी आपल्या जिल्हातील/तालुक्यातील अथवा जवळच्या अभ्यासकेंद्रावर आपला प्रवेश निश्चित करावा. प्रवेशासाठी अभ्यासकेंद्राचे केंद्रप्रमुख/केंद्रसमन्वयक यांच्याशी संपर्क करावा परंतु प्रवेशासाठी विद्यार्थ्यांने विद्यापीठ कार्यालयाशी संपर्क करण्याची आवश्यकता नाही.

१०. प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रवेश घेतल्या पासून पाच वर्षांच्या आत पदवी पूर्ण करावी. या पाच वर्षाच्या दरम्यान पदवी पूर्ण न केल्यास पुन्हा पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला प्रवेश द्यावा. या पाच वर्षांच्या नंतर संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द समजावा.

**शुल्क**

०१. अभ्यासकेंद्राने पदव्युत्तर एम.ए. साठी प्रवेशित विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी प्रवेश शुल्क ३१०० रूपये, (२१०० कोर्स शुल्क व १०००/— स्वयंअध्ययन साहित्य शुल्क फक्त सॉप्ट कॉपी (PDF) साठी ) प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येईल. तसचे पात्रता शुल्क आपल्या विद्यापीठाचा विद्यार्थी असेल तर १२६/— रूपये इतर विद्यापीठाचा विद्यार्थी असेल तर २४२ रूपये, परीक्षा प्रती सत्र शुल्क रूपये ७१७/— याप्रमाणे विद्यापीठात जमा करावे. आपल्या अभ्यासकेंद्रासाठी रूपये १,५०० रूपये अभ्यासकेंद्र शुल्क जमा करून ते आपल्या अभ्यासकेंद्रासाठी वापरावयाचे आहे.

०२. पदव्युत्तर एम.कॉम. अभ्यासक्रमासाठी प्रती विद्यार्थी प्रवेश शुल्क रूपये ३०००/— (३००० कोर्स शुल्क व ११००/— स्वयंअध्ययन साहित्य शुल्क फक्त (सॉप्ट कॉपीसाठी (PDF) एकुण रूपये ४१००/— पात्रता शुल्क आपल्या विद्यापीठाचा विद्यार्थी असेलतर १२६ रूपये बाहेरचा विद्यापीठाचा विद्यार्थी असेल तर २४२ प्रमाणे तसेच परीक्षा शुल्क रूपये ८८८ रूपये विद्यापीठात जमा करावे. अभ्यासकेंद्रासाठी २४००/— रूपये अभ्यासकेंद्र शुल्क जमा करून ते आपल्या अभ्यासकेंद्रासाठी वापरावयाचे आहे.

**११.आर्थिक**

०१. बहिस्थ अभ्यासकेंद्राने आपल्या अभ्यासकेंद्राचा हिशोब विभागाने पाठविलेल्या अभ्यासकेंद्र शुल्क खर्च विवरणाप्रमाणे ठेवून वर्षाच्या शेवटी सर्व जमा खर्चाचे विवरण संस्थेच्या लेखापरीक्षक यांच्या (Auditor) मार्फत करून तेरीज ताळेबंद व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) ३१ ऑगस्ट पर्यंत विद्यापीठास जमा करावे.

०२. बहिस्थ अभ्यासकेंद्राने अभ्यासकेंद्राच्या नावे राष्ट्रीयीकृत बॅकेत केंद्रप्रमुख आणि केंद्रसमन्वयक यांच्या नावे स्वतंत्र खाते उघडावे व त्याच खात्यातून आर्थिक व्यवहार करावा.

०३. अभ्यासकेंद्रासाठी तयार करण्यात आलेली नियमावली ही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'बहिस्थ शिक्षण विभाग' या पोर्टलवर उपलब्ध आहे.

०४. विषयानुरूप प्राध्यापकांची नियुक्ती करून त्यांचेकडून समंत्रणे, चर्चा सत्र, प्रात्यक्षिके,गटचर्चा याचे सादरीकरण करून घ्यावे तसेच विषय निहाय प्राध्यापकांची (संमत्रक यादी) विद्यापीठाच्या बहिस्थ शिक्षण विभागास सादर करावी.

०५. प्रवेश घेतेवळी विद्यार्थ्यांने घेतलेला विषय कोणताही सबबीवर बदलता येणार नाही यांची विद्यार्थ्यांना पूर्व सूचना देण्यात यावी.

०६. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतेवळी विचार करूनच आपल्या जवळचे अभ्यासकेंद्र निवडावे एकदा निवडलेले अभ्यासकेंद्र बदलता येणार नाही तसेच काही अपरिहार्य कारणास्तव अभ्यासकेंद्र बदलावयाचे असल्यास बहिस्थ शिक्षण विभागाच्या पूर्व परवानगीने अभ्यासकेंद्र बदलता येईल त्यासाठी दोन्ही अभ्यासकेंद्राची परवानगी व १०००/— रूपये अभ्यासकेंद्र शुल्क आणि १०००/— रूपये प्रक्रिया शुल्क विद्यार्थ्यास भरणे आवश्यक राहिल. अभ्यासकेंद्र शुल्क बदललेल्या अभ्यासकेंद्रावर व प्रक्रिया शुल्क बहिस्थ शिक्षण विभागात भरावी लागेल.

**समंत्रण**

०१. आपल्या अभ्यासकेंद्रावर विषय निहाय समंत्रणाचे वेळापत्रक तयार करून त्याची एक प्रत बहिस्थ शिक्षण विभागास सादर करावी. त्या नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे तसेच सुट्टीच्या दिवशी रविवारी समंत्रणे आयोजित करावीत.

**परीक्षा**

०१. बहिस्थ प्रवेशित विद्यार्थ्यांना एकाच वेळी पारंपरिक अभ्यासक्रमाची व बहिस्थ अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा देवून दोन पदव्या एकाच वर्षात प्राप्त करता येवू शकतात. परंतु पारंपरिक अभ्यासक्रमाची व बहिस्थ अभ्यासक्रमाची परीक्षा एकाच वेळी आली तर कोणतीही एकच परीक्षा देता येईल याची नोंद घ्यावी. तसेच पारंपारिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व बहिस्थ अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाच वेळी घेण्यात येईल.

०२. बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्रावर समंत्रणे घेणारा प्राध्यापक हा शासनमान्य किमान शैक्षणिक अर्हता धारक असावा.

०३. बहिस्थ प्रवेशित विद्यार्थ्यांचे संपर्क सत्रातील उपस्थिती पट तसेच प्राध्यापकांचे उपस्थिती पट तयार करून त्या वर केंद्रप्रमुख यांची स्वाक्षरी घ्यावी.

०४. बहिस्थ शिक्षण केंद्राच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमातील विविध विषयासाठी समुपदेशन, समंत्रण (Councelling) देणारे प्राध्यापक योग्य ती शैक्षणिक अर्हताधारण केलेले, कायम स्वरूपी विद्यापीठ मान्यता प्राप्त अनुभवी प्राध्यापक असावेत.

०५. प्रवेशित विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश देतेवळी विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात येणारी शुल्काची पावती देण्यात यावी.

०६. ओळख पत्राशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसून दिले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

०७. बहिस्थ विद्यार्थ्यांस परीक्षा केंद्र बदलून मिळणार नाही यांची नोंद घ्यावी.

०८. बहिस्थ अभ्यासक्रमाची परीक्षा ही विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाकडून घेतली जाते.

०९. आपल्या अभ्यासकेंद्रावर परीक्षा केंद्र मिळण्यासाठी बहिस्थ शिक्षण विभागाकडे वारंवार विचारणा अथवा मागणी करूनये परीक्षाकेंद्र देणे हा परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचा अधिकार आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, अंतर्गत बहिस्थ शिक्षण विभाग**

दिनांक :—२७/०५/२०२६

## बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद मान्यता निकष

०१. बहिस्थ शिक्षण विभागाचे नवीन अभ्यासकेंद्र हे केवळ विद्यापीठ परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिगोंली व लातूर या चार जिल्हासाठीच देण्यात येतील.

०२. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील केवळ विद्यापीठ मान्यताप्राप्त संलग्नित महाविद्यालयानीच बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्रासाठी मागणी चा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

०३. बहिस्थ अभ्यासकेंद्रासाठी मागणी करणारे महाविद्यालय स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता प्राप्त अनुदानीत/विना अनुदानीत/स्वयं अर्थसाहाय उपलब्ध करून देणारे असावेत.

०४. सदरील महाविद्यालयात पदवी/पदव्युत्तर स्तरावरील कला, वाणिज्य, व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांना मान्यता असावी.

०५. बहिस्थ शिक्षण विभागाचे पदव्युत्तर एम.ए. (भाषा मराठी, हिन्दी, इंग्रजी, उर्दु, पाली, सामाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व लोकप्रशासन १० विषय) आणि एम. कॉम. अभ्यासक्रम आपल्या केंद्रावर नवीन शैक्षणिक धोरण २०२० (NEP) सत्र पध्दतीनुसार राबवावे.

०६. बहिस्थ शिक्षण प्रणालीमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांचे वर्गात त्यासाठी समंत्रण देणाऱ्या शिक्षकांनी समंत्रण कला, समुपदेशन या बाबत अधिक सजग असणे आवश्यक आहे. व्याख्यान पध्दतीचा येथे अवलंब करू नये.

०७. काही महाविद्यालयात/अभ्यासकेंद्रावर विषय समंत्रण व समुपदेशनासाठी महाविद्यालयातील मान्यता प्राप्त प्राध्यापकांची कमतरता असेल, अशा वेळी केंद्रप्रमुख (प्राचार्य) आपल्या महाविद्यालयातील व त्या परीसरातील योग्य शैक्षणिक अर्हता व अनुभव असणाऱ्या शिक्षकास तसेच तासिका तत्वावरील अस्थाई स्वरूपात काम करणाऱ्या शिक्षकास प्राचार्याच्या मान्यतेने समंत्रक म्हणून नियुक्त करता येईल. तसेच नियुक्त केलेल्या संमत्रकांची यादी बहिस्थ शिक्षण विभागास सादर करावी.

०८. अभ्यासकेंद्र मान्यतेसाठी संबंधित महाविद्यालयाची स्वंतत्र इमारत संस्थेकडे असावी. त्यात योग्य त्या भौतिक सुविधा, वर्ग खोल्या उपलब्ध असाव्यात.

०९. अभ्यासकेंद्र असणाऱ्या महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय असतेच परंतु त्या ग्रंथालयाचा वापर बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त, सुट्टीच्या दिवशी किंवा ज्या दिवशी संपर्क तासिका असतील, त्या काळात उपलब्ध करून देण्यात येणे बंधनकारक आहे. तसेच ग्रंथालयाचा वापर करणाऱ्या बहिस्थ विद्यार्थ्यांनी नियमानुसार संबंधीत ग्रंथालयाचे शुल्क आकारून त्याचा वापर करावा.

१०. विद्यापीठ बहिस्थ शिक्षण विभागाचे अभ्यासकेंद्र चालविण्यासाठी स्वतंत्र कार्यालय असावे. त्यावर अभ्यासकेंद्राचा नामफलक लावणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासकेंद्राच्या कामकाजासाठी महाविद्यालयात प्राध्यापक, लिपीक, सेवक असा पुरेसा कर्मचारी वर्ग असावा. अभिलेखे यासाठी आलमारी, संगणक, इंटरनेट सेवा फर्निचर इत्यादी उपलब्ध करून देण्यात यावे.

११. अभ्यासकेंद्राच्या कार्यालयीन, प्रशासकीय व शैक्षणिक व्यवहार पाहण्यासाठी प्राचार्य (केंद्रप्रमुख) यांनी प्राध्यापकाची 'केंद्रसमन्वयक' म्हणून नियुक्ती करावी. व सर्व अभ्यासकेंद्राच्या व्यवहाराची जबाबदारी केंद्रप्रमुख व केंद्रसमन्वयक यांची राहील.

१२. विद्यापीठाच्या बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्राचे स्वतंत्र बॅक खाते उघडलेले असावे व त्यातूनच सर्व जमा खर्चाचा व्यवहार करण्यात यावा.

१३. विद्यापीठाचे बहिस्थ अभ्यासकेंद्र चालवित असताना विद्यापीठाचे, बहिस्थ विभागाकडून वेळोवेळी जाहीर होणारे नियम, अटी, सूचना सदरील महाविद्यालयामधील अभ्यासकेंद्रास बंधन कारक राहतील.

१४. अभ्यासकेंद्राने जमा खर्चाचा हिशोब विभागाने पुरविलेल्या ''अभ्यासकेंद्र शुल्कविवरण'' तक्त्या प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

१५. अभ्यासकेंद्रानी आर्थिक व्यवहार, परीक्षा इत्यादी बाबत संपूर्णतः पादर्शकता बाळगणे बंधनकारक आहे.

१६. अभ्यासकेंद्र शुल्क (जमा/खर्च) हिशोब प्रतिवर्षी संस्थेच्या लेखापरीक्षक (Auditor) यांचेकडून तपासून घेवून त्याचे तेरीज ताळेबंद व त्याप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) ३१ ऑगस्ट त्या वित्तीय वर्षात विभागाला दाखल करणे बंधनकारक आहे.

१७. सदरील महाविद्यालयाची समितीव्दारा संपूर्ण तपासणी करूनच तसा अहवाल संचालक, बहिस्थ शिक्षण विभागातर्फे समितीव्दारे मा. कुलगुरू महोदय यांना सादर केला जाईल.

१८. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना अभ्यासकेंद्र मान्यतेचे उपरोक्त निकष निश्चित करण्यात आले असून सदरील निकष पूर्ण करण्याऱ्या महाविद्यालयांनीच नवीन अभ्यासकेंद्र मागणी प्रस्ताव दाखल करावा.

# Academic Calendar:-

## Academic Calendar of Post Graduate Courses (Semister Pattern )
## Master of Arts and Master of Commerce

| Sr. No. | Particular | PG Courses (Semester Pattern) |
|---|---|---|
| 01 | Publication of advertisement in the newspaper | 1 July 2026 |
| 02 | Admission process at the study centers | 01 August To 30 September 2026 |
| 03 | Last date of closing the admission | 30 September 2026 |
| 04 | Submission of admission, Eligibility and exam fees by the college to the University (DD, Cash, RTGS OR NEFT) | 15 Oct 2026 |
| 05 | Submission of admission, Eligibility and exam forms by the college to the University | 01/11/2026 On Words |
| 06 | Organization of contact session at the study centers | Octomber 2026 to February 2027 |
| 07 | I[st]& III Semester | As per Regular Course |
| 08 | II[rd]& IV[rth] Semester | As per Regular Course |
| 09 | Result | As per Regular Course |
| 10 | First Year Examination (Old Yearly Pattern) | As per Regular Course |
| 11 | Second Year Examination (Old Yearly Pattern) | As per Regular Course |

# (New) Fee Structure

**Fee Structure :- (New)**

**Master of Arts:**

**(Marathi, Hindi, English, Urdu, Pali, History, Political Sciences, Sociology, Economics & Public Administration) Per Year**

| Particular of the fees | Home University Students | Other University Students |
|---|---|---|
| Admission fees | 100/- | 100/- |
| Course fee + Soft Copy of Study Material (PDF) | 3000/- | 3000/- |
| Study center fees | 1500/- | 1500/- |
| Examination fees (Per Semester) | 717/- | 717/- |
| Eligibility fees (I Year only) | 126/- | 242/- |
| Total Fees | 5443 /- | 5559 /- |

**Master of Commerce (M. Com) Per Year**

| Particular of the fees | Home University Students | Other University Students |
|---|---|---|
| Admission fees | 100/- | 100/- |
| Course fee + Soft Copy of Study Material (PDF) | 4000/- | 4000/- |
| Study center fees | 2400/- | 2400/- |
| Examination fees | 888/- | 888/- |
| Eligibility fees (I Year only) | 126/- | 242/- |
| Total Fees | 7514/- | 7630/- |